## निशाणी क्र. ७ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

३. सदर अर्जातील कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारात उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदारांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

४. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, त्यांनी सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदार क्र. १ ते ३

यांच्या नावामध्ये तसेच मयत काडूबाळ उर्फ कडूबा दशरथ जाधव अनावधानाने असे नमूद झाले आहे. परंतु अर्जदारांच्या नावामध्ये तसेच मयत **कडूबाळ उर्फ कडूबा दशरथ जाधव** यास्तव त्यांनी दुरूस्ती करून मागितली आहे.

**५.** अर्जदारांनी सदर अर्जासोबत स्वतःचे प्रतिज्ञापत्र देखील जोडलेले आहे. यास्तव मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. अर्जदारांनी मुदतीमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

SHAIKH MOHSIN ASLAM
Digitally signed by SHAIKH MOHSIN ASLAM
Date: 2026.01.12 17:57:16 +0530

दिनांक : १२/०१/२०२६. (एम. ए. शेख)

गंगापूर. २ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, गंगापूर.